# निर्णयकर्ते राज्यपाल

*कर्नाटकामध्ये निवडणुकांनंतर सुरू झालेलं नाट्य भारतातील घटनात्मक लोकशाहीच्या अवस्थेविषयी गंभीर प्रश्न उपस्थित करणारं आहे.*

कर्नाटकातील गेल्या चार विधानसभा निवडणुकांमध्ये तिसऱ्यांदा मतदारांनी एकाच पक्षाला निर्णायक जनादेश दिलेला नाही. बारा मे रोजी मतदान झालेल्या २२२ जागांपैकी १०४ जागांवर विजय मिळालेल्या भारतीय जनता पक्षानं (भाजप) स्वतःला जनादेश मिळाल्याचा दावा केला. तर काँग्रेस पक्षाच्या मतानुसार, त्यांना सर्वाधिक मतांचा वाटा मिळाला, किंबहुना आधीचं सरकार त्यांचंच असतानाही त्यांचा मतांमधील वाटा वाढला आहे, त्यामुळं जनादेश त्यांच्या विरोधात गेलेला नाही. अर्ध्याहून अधिक मतांचा वाटा व जागा ताब्यात असलेल्या काँग्रेस व (धर्मनिरपेक्ष) जनता दल यांनीही एकत्र येऊन सरकारस्थापनेसाठीच्या जनादेशावर दावा सांगितला.

अशा परिस्थितीत कोणती कृती करावी याचं मार्गदर्शन करणारा एकच-एक कायदा नाही, त्यामुळं सरकार स्थापन करण्यासाठी कोणाला निमंत्रित करायचं याच्या कायदेशीर निर्णयाची जबाबदारी सर्वस्वी कर्नाटकाचे वजुभाई वाला यांच्याकडं होती. निवडणुकांनंतर कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालं नसेल, तर सर्वाधिक मोठा पक्ष किंवा निवडणुकीनंतरची सर्वांत मोठी युती यांपैकी कोणाला प्राधान्य द्यावं, याचाही काही क्रम सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांमधून राज्यपालांना देण्यात आलेला नाही. संख्याबळाचा तारतम्यानं केलेला विचार आणि स्थिर सरकार मिळण्यासाठी आवश्यक तजवीज, या दोन घटकांच्या आधारे निर्णय घेण्याचे अधिकार राज्यपालांना आहेत. कोणत्याही पक्षाला वा युतीला सरकारस्थापनेसाठी निमंत्रित केलं तरी तो निर्णय अंतिम स्वरूपाचा असणार नाही. राज्यपालांनी निमंत्रित केलेल्या पक्षाला विधानसभेच्या सभागृहामध्ये स्वतःचं बहुमत सिद्ध करावं लागणार होतं.

निवडणुकांमधील वैविध्यपूर्ण निकालांचा विचार करता राज्यपालांच्या कृतींविषयी काही पूर्वनिर्धारित सूचना करणं विपरित परिणाम करणारं ठरू शकतं. विधानसभेतील बहुमत कायदेशीर अथवा कायदाबाह्य मार्गांनी जमवून आणता येतं, हे खरं असलं तरी सरकारस्थापनेसाठी गैरमार्गांना फारसा वाव मिळू नये यावर लक्ष ठेवणं हे राज्यपालांचं घटनात्मक कर्तव्य व अधिकार असतो. कर्नाटकामध्ये राज्यपाल वाला यांनी सरकारस्थापनेसाठी भाजपच्या बी. एस. येडियुरप्पांना निमंत्रित केलं आणि सभागृहात बहुमत सिद्ध करण्यासाठी त्यांना १५ दिवसांचा अवधीही दिला. आजच्या काळात राज्यपालांसारख्या घटनात्मक उच्च पदांकडून फारशी अपेक्षा ठेवताच येत नाही, याची जाणीव वाला यांनी या निमित्तानं पुन्हा एकदा करून दिली. राज्यपालांनी अनाग्रहीपणे, तटस्थपणे व निःपक्षपातीपणे कार्यरत असावं, अशी घटनासभेची अपेक्षा होती; पण स्वतंत्र भारताचा इतिहास पाहिला तर घटनासभेच्या या

अपेक्षांचा वेळोवेळी भंगच झालेला दिसतो. १९५०च्या दशकात मद्रासचे तत्कालीन राज्यपाल श्री प्रकाश यांनी निवडणुकीनंतरच्या सर्वांत मोठ्या युतीची दखल घेण्याऐवजी काँग्रेसच्या सी. राजगोपालाचारी (जे तेव्हा आमदारही नव्हते) यांना सरकार स्थापन करण्यासाठी निमंत्रित केलं होतं. म्हणजे घटनासभेच्या अपेक्षाभंगाची सुरुवात अगदी सुरुवातीपासूनच झाली होती.

राज्यपाल वाला यांच्या कृतीमागील पक्षपातीपणा आणि अप्रामाणिकपणा लपता लपत नव्हता. येडियुरप्पांना त्यांनी गोपनीय पद्धतीनं निमंत्रण दिलं आणि शपथविधीही एका रात्रीत उरकण्यात आला, यातून राज्यपालांची भाजपला साहाय्य करण्याची पक्षपाती वृत्तीच दिसते. नवनिर्वाचित विधानसभेमध्ये काँग्रेस व धर्मनिरपेक्ष जनता दल यांचं एकत्रित संख्याबळ ११५ म्हणजे अर्ध्याहून अधिक होतं, पण कमी जागा असलेल्या भाजपला सरकार स्थापण्यासाठी निमंत्रण मिळालं. शिवाय काँग्रेस व धर्मनिरपेक्ष जनता दल यांच्या आमदारांना येनकेन मार्गांनी फोडून स्वतःच्या बाजूला फिरवण्यासाठी भाजपला बराच वेळही देण्यात आला. त्यात भर म्हणून वाला यांनी विधानसभेतील बहुमताची चाचणी होण्याआधीच एका अँग्लोभारतीय सभासदाला विधानसभेवर जाण्यासाठी नामांकन दिलं. वाला यांच्या या कृतीमुळं, 'अनिल कुमार झा विरुद्ध भारतीय संघराज्य' (२००५) या खटल्यात सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निकालाचा थेट भंग झाला आहे.

सर्वोच्च न्यायालयानं कर्नाटकातही हस्तक्षेप केला आणि दुसऱ्याच दिवशी (१९ मे) विधानसभेत भाजपनं बहुमत सिद्ध करावं असे आदेश दिले. त्यामुळं बहुमतासाठी खोट्यानाट्या मार्गांचा वापर करण्याला आळा बसला आणि या प्रक्रियेचे किमान पावित्र्य तरी टिकलं. बहुमत चाचणीच्या आधीच अँग्लो-भारतीय आमदाराला नियुक्त करण्याची राज्यपालांची खटपट आणि मंत्रिमंडळ स्थापन व्हायच्या आधीच सरकार चालवण्याची येडियुरप्पांची उतावीळ वृत्ती यांमुळं सर्वोच्च न्यायालयाची या प्रक्रियेविषयीची साशंकता वाढली असावी. खरं तर सर्वोच्च न्यायालयाचीही संस्थात्मक विश्वासार्हता सध्या नीचांकी आहे, पण तरीही महत्त्वाच्या राजकीय प्रक्रियांवर देखरेख ठेवण्याबाबत आपण पुरेसा निःपक्षपातीपणा व तटस्थता राखून आहोत, हे न्यायालयानं दाखवून दिलं आहे.

राज्यपालांच्या भोंगळ कारभाराचा दोष मात्र केवळ एका पक्षावर वा एका नेत्यावर टाकता येणार नाही. केंद्रातील जवळपास सगळ्याच सरकारांनी पक्षपाती कारणांनी राज्यांमधल्या राजकारणात हस्तक्षेप करण्याकरिता राज्यपाल पदाचा वापर केला आहे अथवा तसा वापर करण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रपती राजवट लादणं असो, किंवा सत्ताधारी पक्षाच्या बहुमताला प्रश्नांकित करत 'पक्षफुटी'च्या क्लृप्त्या लढवणं असो, राज्यपालांनी केंद्रातील सत्ताधारी पक्षाच्या हितसंबंधांना सोईस्कर डावपेच लढवलेले आहेत. स्वतंत्र भारताच्या इतिहासामध्ये राज्यपाल वाला यांची कृती अपवादात्मक वा अभूतपूर्व आहे, असा दावा कोणी केला तर ते अप्रामाणिकपणाचं ठरेल.

निवडणुकांची नियमितता, त्यामधील वाजवीपणा आणि निवडणुकांसाठीचं स्वतंत्र वातावरण यांवरून भारतातील लोकशाहीचं आरोग्य तपासायचं झालं तर या लोकशाहीची तब्येत धडधाकट असल्याचा निष्कर्ष काढण्याचा मोह काहींना होऊ शकतो. पण निवडणुकांनंतर काय होतं हे पाहिलं तर हा निष्कर्ष नाट्यमयरित्या बदलूही शकतो. विशेषतः गेल्या वर्षी हे प्रकर्षानं दिसून आलं : गोवा, मणिपूर व मेघालय इथं निवडणुकांच्या निकालांचा आणि शेवटी सरकार कोण स्थापन करतंय याचा जणू काहीच संबंध नसल्यासारखी परिस्थिती होती. आता कर्नाटकामधील विधानसभा निवडणुकांनीही आपल्याला भारतातील घटनात्मक लोकशाहीची खरी अवस्था दाखवून दिली आहे.

●

# भारतीय राजकारणातील सरंजामशाही

*काहीही करून विजय प्राप्त करण्याची भाजपची महत्त्वाकांक्षा कर्नाटक निवडणूक प्रचारामध्ये दिसून आली.*

कर्नाटकातील निवडणुकीच्या निकालांचं विश्लेषण विविध प्रकारे होऊ शकतं. काँग्रेस व (धर्मनिरपेक्ष) जनता दल या दोन पक्षांच्या राजकारणातील आत्मविश्वासाचा अभाव या निवडणुकीत दिसून आला. या दोन पक्षांनी निवडणुकांपूर्वी युती केली असती, तर निकालांनंतर त्यांना आणखीनच सुरक्षित स्थान प्राप्त झालं असतं. कर्नाटकातील जनतेसाठी निवडणुका निःसंशयपणे महत्त्वाच्या आहेत, पण भारतीय जनता पक्षाचं (भाजप) मत मात्र याच्या उलटं असल्याचं दिसतं. भारतावर राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याची महत्त्वाकांक्षा साध्य करण्यासाठी भाजपला या निवडणुका आत्यंतिक महत्त्वाच्या होत्या. (भारतातील) ८० टक्के निवडणुकीय प्रदेशावर आता भाजपचा ताबा आहे, असं विधान काही भाजप नेत्यांनी केलं. भारताचा नकाशा वापरून या विधानाचं चित्र दाखवणाऱ्या छापील माध्यमांनीही या महत्त्वाकांक्षेविषयी स्पष्टता आणली. हिंदुत्ववादी राजकीय कल्पनाचित्रानुसार, निवडणुकांमधील यश हे समतावादी दृष्टीचा विस्तार मानलं जात नाही, तर प्रादेशिक नियंत्रण म्हणून त्याकडं बघितलं जातं.

लोकशाही रचनेमध्ये औपचारिक सत्ता काबीज करण्याची भाजपची राजकीय महत्त्वाकांक्षा वैध असली, तरी पक्ष कार्यकर्ते आणि व्यापक मतदारवर्ग यांच्यावर नैतिक शिस्तीचा प्रभाव टाकण्यासाठी सभ्य भाषेचा वापर अधिक महत्त्वाचा आहे. उदाहरणार्थ, २०१४च्या लोकसभा निवडणुकांच्या प्रचारामध्ये व जाहीरनाम्यामध्ये भाजप सरकारनं दिलेल्या आश्वासनांबाबत कोणती कार्यवाही झाली, त्यासाठी कोणते प्रयत्न केले गेले, याची माहिती मतदारांना देणं, हा असा एक नीतिमान मार्ग असू शकतो. परंतु, असं काही करण्याऐवजी भाजपच्या नेत्यांनी कर्नाटकच्या निवडणूक प्रचारामध्ये वेगळेच मुद्दे उपस्थित केले. भाजपनं आश्वासनांची अंमलबजावणी कशी केली, याच्याशी या मुद्द्यांचा काहीच संबंध नव्हता. किंबहुना, निवडणुकांपूर्वीची आश्वासनं अंमलात आणण्यात अपयश आल्यामुळं भाजप राजकीय विरोधकांविरोधात अतिशय अपरिपक्व भाषेचा वापर करतो.

प्रतिस्पर्धी व विरोधक यांच्या शब्दवापराचा विचार करून राजकीय नेत्यानं सभ्य/सौम्य भाषा वापरणं योग्य ठरतं. भाजपच्या 'काँग्रेसमुक्त भारत' वा काँग्रेसचं राजकीय उच्चाटन करण्याच्या मोहिमेला अशा शब्दवापराचा काहीच उपयोग होत नाही. आपल्या राजकीय विरोधकांची प्रतिमा शत्रू म्हणून उभी राहावी, ही भाजपची गरज बनली आहे. अशा प्रतिमेची निर्मिती करायची असल्यामुळं भाजपचे नेते पुरुषी, सैनिकी भाषेचा वापर करतात. अलीकडंच झालेल्या कर्नाटक निवडणुकांच्या प्रचारामध्ये भाजपच्या काही प्रमुख नेत्यांनी दोन प्रकारची भाषा वापरली. एकीकडं ही भाषा अपरिपक्व होती आणि त्याचसोबत पुरुषी व सैनिकी प्रवृत्ती दाखवणारी होती. विरोधी पक्षांच्या- विशेषतः काँग्रेसच्या नेत्यांवर वैयक्तिक हल्ला करणारी अपरिपक्व भाषा भाजप नेत्यांनी वापरली. त्याचसोबत, मुख्य शत्रूचं- म्हणजे काँग्रेसचं राजकीय उच्चाटन करण्याचा हेतू अधोरेखित करणारी सैनिकी स्वरूपाची भाषा भाजपचे अध्यक्ष अमित शहा यांनी वापरली. किंबहुना, कोणीच विरोधक नसलेला सत्ताधारी पक्ष बनणं ही भाजपची महत्त्वाकांक्षा आहे. भाजपच्या या नेत्यांचं दुर्दैव हे आहे की, त्यांच्या महत्त्वाकांक्षेच्या विरोधात जाणारा योग्य राजकीय निवाडा करण्याची परिणामकारक नैतिक कार्यक्षमता मोठ्या संख्येनं मतदारवर्ग

दाखवत आहे आणि लोकशाहीची तर्करचनाही या महत्त्वाकांक्षेला पूरक ठरत नाही, त्यामुळं भाजपला इच्छेप्रमाणे जनादेश मिळवता आला नाही. ईशान्येमध्ये मेघालय व मणिपूर या दोन राज्यांमध्ये हे दिसून आलं आणि पश्चिम व दक्षिण भारतात अनुक्रमे गोवा व कर्नाटकातही हे दिसून आलं.

केंद्रात आणि राज्यांमध्ये औपचारिक राजकीय सत्ता काबीज करण्याची भाजपची महत्त्वाकांक्षा असल्यामुळं अनीतिमान राजकीय मार्ग अवलंबायलाही ते मागं-पुढं पाहात नाहीत. सदर राज्यांमध्ये सरकार स्थापन करण्याचा सर्वांत मोठ्या पक्षाचा दावा फोल ठरवत भाजपनं लोकशाही संकेतांचा भंग केला आहे. मेघालयात तर केवळ दोन आमदार असतानाही सरकार स्थापन करण्याइतकं धोकादायक व उद्वेगजनक राजकीय निर्ढावलेपण भाजपनं दाखवलं. हाच पक्ष कर्नाटकात मात्र स्वतःकडं बहुमतापेक्षा कमी आमदार असतानाही सत्तेवर दावा सांगायला पुढं आला.

काहीही झालं तरी विजय आपलाच असायला हवा, अशी भाजपच्या नेत्यांची भावना झाली आहे. सत्ता काबीज करणं या अंतिम उद्दिष्टप्राप्तीसाठी नैतिकतेची फिकीर भाजपला राहिलेली नाही. परंतु, सभ्य लोकशाहीचं भवितव्य या अंतिम उद्दिष्टावर अवलंबून नसतं, तर लोकशाही संकेतांना धुडकावणारी असभ्य भाषा व कुटील हेतू यांना आळा घालणाऱ्या संघटनप्रक्रिया यांवर अवलंबून असतं. सभ्य लोकशाहीची मुळं सखोल नेण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या पक्ष कार्यकर्त्यांनी निवडणूक प्रक्रियांमध्ये आदर्शरूपी आशयाची रुजवण करणं अपेक्षित आहे. गतकाळातील उतरंड पुन्हा आणण्याची इच्छा या सभ्य लोकशाहीच्या संकल्पनेला छेद देणारी आहे.

विशिष्ट जातीच्या सामाजिक प्रभुत्वाशी निगडित गतकालीन राजकीय सत्तारचना पुन्हा आणणं, हा भाजपच्या राजकीय कृतीचा गर्भितार्थ आहे. उतरंडीवर आधारित सामाजिक प्रभुत्वाची रचना पुन्हा आणण्याचा छुपा कार्यक्रम राबवण्यासाठी औपचारिक लोकशाहीची चौक वापरू पाहाणारा राजकीय पक्ष आणि भारतीय राजकारणात कौटुंबिक सत्तेचं प्रभुत्व टिकवून ठेवणारा दुसरा राजकीय पक्ष यांच्यात निवड करावी तरी कशी, याचं आश्चर्य आपल्यासारख्या सभ्य लोकशाहीच्या समर्थकांना वाटत असतं. मी शासन करेन आणि शासितही असेन हे मूलभूत नैतिक तत्त्व अव्हेरणाऱ्या या सरंजामी महत्त्वाकांक्षा आहेत. या विजयासाठीच्या लढाईत मी शासन करेन आणि बहुधा कायम मीच शासक असेन असा पवित्रा घेतला जातो. ●

---

## चकमकीच्या नावाखाली जनसंहार

*गडचिरोलीमध्ये झालेला 'माओवाद्यां'चा भीषण जनसंहार आणि भरीला विकासाच्या खोल लाल जखमा*

महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यामध्ये भामरागड तालुक्यात बोरिया व कसनसूर या गावांच्या दरम्यान कुठंतरी २२ एप्रिलच्या सकाळी माओवाद्यांनी एक तळ ठाकलेला होता, त्यातील काही जण न्याहारी करत होते तर काही जण आराम करत होते. तेव्हा त्या ठिकाणी मोठ्या संख्येनं केंद्रीय राखीव पोलीस दलाचे व सी-६० दलाचे जवान आले. यातील काही जवानांकडं अंडर-बॅरल ग्रेनेड लाँचर होते. त्यांनी माओवाद्यांना घेराव घातला आणि सरसकट गोळीबार केला, त्यामध्ये तळावरील सर्व जण मारले गेले. या चकमकीत १६ माओवाद्यांना ठार करण्यात आल्याचा दावा पोलिसांनी केला आणि निवडक पत्रकारांना घटनास्थळी नेलं. या पत्रकारांनी सरकारी कथनानुसार निष्ठापूर्वक वार्तांकन केलं. पुढच्याच दिवशी पोलिसांनी

आणखी सहा माओवाद्यांना चकमकीत मारल्याचा दावा केला. या वेळी जिमलगट्टा वनातील राजाराम खांडला या गावामध्ये गोळीबार झाला होता. त्यानंतर २४ एप्रिलला पोलिसांनी जाहीर केलं की, त्यांना इंद्रावती नदीमध्ये १५ प्रेतं सापडली आहेत. २२ एप्रिलच्या चकमकीत मारण्यात आलेल्या इतर माओवाद्यांची ही शवं असल्याचं पोलिसांनी सांगितलं. त्यानंतर नदीमधून आणखी तीन शवं बाहेर काढण्यात आली. त्यामुळं एकूण दोन चकमकींमध्ये मिळून ४० 'माओवाद्यां'ना ठार करण्यात आलं. 'चकमकफेम' ठरलेल्या अधिकाऱ्यांना पारितोषिकं व बढत्या मिळणार आहेत, आणि या घटना साजऱ्या करण्यासारख्या आहेत, अशाही घोषणा झाल्या!

लढणारे व न लढणारे यांच्यातील भेद बंडखोरीविरोधी कारवाईदरम्यान जाणीवपूर्वक पुसट केला जातो. उपरोल्लेखित घटनांत मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये केवळ २२ जण आपल्या दलांमधील होते, असं माओवाद्यांनी म्हटलं आहे. नंतर काही पालकांनी आपली अपत्यं बेपत्ता झाल्याच्या तक्रारी दाखल केल्या, तेव्हा उजेडात आलेल्या माहितीनुसार, २१ एप्रिलच्या रात्री आठ तरुण पुरुष व महिला गट्टेपल्ली गावातून कसनसूरकडं लग्नासाठी निघाले होते, त्यांना पोलिसांनी उचललं आणि ठार केलं. ही प्रेतं नंतर मृत माओवाद्यांच्या प्रेतांमध्ये टाकण्यात आली आणि २२ एप्रिलच्या चकमकीतच या सर्वांचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला. या चकमकीत मृत्युमुखी पडलेल्या एका माओवादी नेत्याच्या वडिलांनी स्वतःच्या मुलाचं प्रेत पाहिलं तेव्हा त्यावर त्यांना कुऱ्हाडीचा खोल वार झालेला दिसला. या सर्व घटनाक्रमामधील क्रौर्य व निर्घृणपणाही यातून समोर येतो, पण सत्ताधाऱ्यांना या कशाचं काहीही वाटेनासं झालेलं आहे.

खाणप्रकल्पांमधून बड्या उद्योगांना होणारा लाभ, त्या लाभातून राजकीय नेत्यांना व भ्रष्ट अधिकाऱ्यांना मिळणारा वरकड वाटा, एवढ्याचीच फिकीर सत्ताधाऱ्यांना आहे. या प्रकल्पांना मोकळी वाट करून देण्यासाठी हेच नेते व अधिकारी दलालाची भूमिका निभावत असतात. माडिया गोंड व इतर वननिवासी समुदायांना खाणकाम नको आहे, कारण त्यातून त्यांच्या टेकड्या, वनं व नद्या नष्ट होतात. त्याचबरोबर आक्रमक भांडवली संस्कृतीमुळं त्यांच्या आदिवासी संस्कृतीचं अधःपतन होतं. लघु वनउत्पादनांवर आधारित लघुद्योगांचा विकास व्हावा आणि या उद्योगाचं व्यवस्थापन स्थानिक ग्रामसभांद्वारे व्हावं, अशी या समुदायांची इच्छा आहे. 'अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्यता) अधिनियम, २००६' आणि 'पंचायत (अनुसूचित क्षेत्रांमध्ये विस्तार) अधिनियम, १९९६' या कायद्यांची अंमलबजावणी व्हावी, अशी या प्रदेशातील आदिवासींची मागणी आहे. मुख्य म्हणजे वनजमिनींचा वापर तथाकथित विकासप्रकल्पांसाठी करण्याचा प्रस्ताव येईल तेव्हा ग्रामसभांना माहिती देऊन त्यांची सहमती घेतल्याशिवाय पुढची पावलं टाकू नयेत, या तत्त्वाचा आदर सरकारनं करायला हवा, अशीही या लोकांची इच्छा आहे. दडपशाही टिकवणाऱ्या हिंसाचाराला त्यांनी आव्हान दिलं की त्यांच्यावर माओवादी असल्याचा शिक्का मारला जातो आणि खाणप्रकल्पांच्या हितसंबंधांचं रक्षण करण्यासाठी राज्यसंस्था अधिक सैनिकीकरण करते.

'लॉइड मेटल्स' या कंपनीनं २००७ साली गडचिरोलीत खाणकामासाठी जमीन भाडेकरारावर घेतली, तेव्हा लोकांचा प्रतिकार सुरू झाला. त्यानंतर खाणकामासाठीचे इतरही काही प्रस्ताव समोर आले. वर्षभरापूर्वीच पर्यावरण, वन व हवामानबदल मंत्रालयाच्या वन सल्लागार समितीनं 'गोपानी आयर्न अँड पावर' या कंपनीच्या प्रस्तावाची शिफारस केली होती. माडिया गोंड आदिवासींसाठी पवित्र ठिकाण असलेल्या सुरजागड टेकड्यांचीही यातून सुटका झालेली नाही. माडियांचा देव ठाकूरदेव यांचे पवित्र निवास या टेकड्यांमध्ये

असल्याचं मानलं जातं. शिवाय, ब्रिटिश वसाहतवादाविरोधात १८५७ साली प्रतिकाराची उभारणी करणारे स्थानिक स्वातंत्र्यसेनानी बाबुराव शेडमाके यांनी या टेकड्यांमध्येच तळ ठोकला होता, अशी लोकस्मृती आहे. खाणी म्हणजे आपल्या परिसरावरच्या 'खोल लाल जखमा' आहेत, त्यातून सांस्कृतिक व पर्यावरणीय अधःपतन होतं, अन्न व पाण्याचा ऱ्हास होतो आणि आदिवासींच्या आर्थिक जीवनमार्गालाच धोका निर्माण होतो, अशी स्थानिकांची भावना आहे.

क्रयवस्तूस्तोमानं ग्रासलेल्या सत्ताधारी वर्गाला मात्र माडिया गोंडांच्या ज्ञानी आकलनामधील या 'खोल लाल जखमां'चं अस्तित्वच मान्य नाही. गृह मंत्रालयाच्या 'डाव्या अतिरेकाविषयीच्या विभागा'नं असा दावा केला आहे की, डाव्या अतिरेकाची लागण झालेल्या प्रदेशातील निरागस आदिवासींना/स्थानिकांना माओवादी चुकीचं मार्गदर्शन करत आहेत आणि भुलवत आहेत. त्यामुळं सत्ताधाऱ्यांनी 'पोलीस दलांच्या आधुनिकीकरणाच्या एकात्मिक योजने'चा भाग म्हणून 'माध्यमविषयक योजना'ही आखलेली आहे. या माओवाद्यांमुळं, 'देशातील अनेक भागांमध्ये कित्येक दशकं विकासाच्या प्रक्रियेला खीळ बसली आहे. हे नागरी समाजानं व माध्यमांनी समजून घ्यायला हवं.' एप्रिलमध्ये गडचिरोलीत झालेल्या 'माओवाद्यां'च्या निर्घृण जनसंहाराचं साजरीकरण सुरक्षादलांसोबतच प्रसारमाध्यमांनीही केलं, त्यामुळं माध्यमांबाबत सत्ताधारी आश्वस्त राहू शकतात. 'डाव्या अतिरेकाच्या प्रभावामुळं कित्येक दशकं मागं पडलेल्या विकास प्रक्रिये'ला, म्हणजे 'खोल लाल जखमा' करण्याच्या कारवाईला वाव मिळावा, यासाठीचे हे सर्व प्रयत्न आहेत. ●

---

## बनावट वाद

*अलीगढ मुस्लीम विद्यापिठावर झालेल्या हल्ल्यामागचं खरं कारण जिना यांच्या चित्राशी संबंधित नव्हतं.*

हिंदुत्ववादी गुंडांकडून विद्यापिठांच्या आवारांवर होणाऱ्या हल्ल्यांना प्रोत्साहन देण्याची आणखी एक संधी भारतीय जनता पक्षाला (भाजप) मिळाली आहे. या वेळी अलीगढ मुस्लीम विद्यापीठाला लक्ष्य करण्यात आलं आहे. या विद्यापीठात १९३८ सालापासून दर्शनी जागेवर असलेल्या मुहम्मद अली जिना यांच्या चित्रावरून हा तथाकथित वाद सुरू झाला. हिंदू युवा वाहिनी आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांच्याशी संलग्न असलेले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य २ मे २०१८ रोजी या विद्यापीठाच्या आवारात घुसले; आणि, हे चित्र काढून टाकावं, असी मागणी त्यांनी केली. या विध्वंसक वृत्तीच्या लोकांवर कारवाई करण्याऐवजी पोलिसांनी तक्रार करण्यासाठी आलेल्या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांवरच काठ्यांनी हल्ला केला आणि अश्रुधूर सोडला.

ब्रिटिशकालीन भारताच्या फाळणीमधील जिना यांच्या अपराधाचा जुना व निष्फळ प्रश्न या बनावट वादामुळं पुन्हा एकदा सार्वजनिक चर्चेचा विषय बनला आहे. व्यावसायिक इतिहासकार आता या प्रश्नाची फारशी फिकीरही करत नाहीत. फाळणीची प्रक्रिया अतिशय व्यामिश्र होती आणि त्यासाठी कोणत्याही एका व्यक्तीला जबाबदारी धरता येणार नाही हे आता मान्य झालेलं आहे. तरीही 'महापुरुषां'भोवतीचे हितसंबंध पटकन विरून जात नाहीत. पाकिस्तान आणि भारत दोन्हीकडं जिना यांचा वापर अनुक्रमे राष्ट्रीय गौरवीकरण आणि खलनायकीकरण यांसाठी केला जातो.

उपखंडाच्या फाळणीसंदर्भातील जिना यांच्या अपराधाबाबतची संदिग्धता अजूनही कायम आहे, याचा दाखला भाजप नेत्यांच्या गोंधळलेल्या प्रतिक्रियांमधूनही मिळाला. बहुतेक भाजप नेत्यांप्रमाणे

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही दंगेखोरांच्या मूळ 'आस्थाविषया'चं समर्थन केलं, पण उत्तर प्रदेशचे कामगार मंत्री स्वामी प्रसाद मौर्य यांनी या हल्ल्याचा धिक्कार केला आणि जिना हे महापुरुष असल्याचं मत नोंदवलं. या मतप्रदर्शनानंतर मौर्य यांना पक्षातून निलंबित करण्याची मागण्या झाल्या. भाजपचे ज्येष्ठ नेते जसवंत सिंह यांच्याबाबतीत २००९ साली हेच घडलं होतं आणि २००५ साली लालकृष्ण अडवाणी यांनाही याच कारणावरून पक्षाध्यक्षपद गमवावं लागलं होतं. वास्तविक या गोंधळाला भाजपचा इतिहास कारणीभूत आहे. मुस्लीम लीग आणि भाजपची पूर्वसुरी असलेली हिंदू महासभा यांच्यातील विचारसरणीय संबंध व इतर जवळीक या इतिहासातील गैरसोयीचा भाग पुसून टाकण्यात भाजपला अजूनपर्यंत यश आलेलं नाही.

पाकिस्तानची मागणी मुस्लीम लीगनं ज्या द्विराष्ट्र सिद्धान्ताच्या आधारे केली, तो काही मुळात भारतीय मुस्लिमांनी मांडलेला नव्हता. या सिद्धान्तामागं हिंदू प्रतिभाशक्तीचाच आविष्कार होता. हिंदू महासभेचे नेते विनायक दामोदर सावरकर यांनी १९२३ साली पहिल्यांदा ही मांडणी केली. दुसऱ्या महायुद्धादरम्यान मुस्लीम लीग व हिंदू महासभा या दोहोंनीही ब्रिटिशांना सहकार्य केलं होतं. बंगालसारख्या प्रांतांमध्ये तर या दोन संघटनांच्या युतीतून मंत्रिमंडळही बनली होती. किंबहुना आपल्या विचारसरणीय गुरूंची संकल्पना चोरून त्याचा तर्कशुद्ध शेवट करत लीगनं मुस्लिमांसाठी सार्वभौम देश मिळवला, याचा राग भाजपच्या मनात असू शकतो. महासभेचा खरा वारसा चालवणारा भाजप मात्र भारताला हिंदूराष्ट्र बनवण्यासाठी खटपट करतोच आहे.

उपखंडाच्या फाळणीचा पूर्ण दोष केवळ जिनांवर टाकण्यालाही भारतीय राजकीय संभाषितामध्ये मोठी परंपरा आहे आणि ती केवळ हिंदुत्ववादी कथनांपुरती मर्यादित नाही. काँग्रेसचे विचारक, काँग्रेसकडं कललेले इतिहासकार यांचं कित्येक दशकं भारतीय अकादमिक विश्वावर वर्चस्व होतं आणि त्यांनी जिनांची खलनायक अशी प्रतिमा सातत्यानं रंगवली. ऐतिहासिक दस्तावेजांनुसार मात्र या प्रतिमेशी न जुळणाऱ्या अनेक बाजू समोर येतात. उदाहरणार्थ, राजकीय कारकीर्दीच्या सुरुवातीच्या बहुतांश काळात जिना पक्के काँग्रेसी होते. त्यांना दादाभाई नौरोजी यांनी मार्गदर्शन केलं होतं, आणि आयुष्यभर त्यांच्या मनात गोपाळ कृष्ण गोखले यांच्याविषयी आदराची भावना होती. राष्ट्रद्रोहाच्या खटल्यात त्यांनी बाळ गंगाधर टिळक यांचा बचाव केला होता. काँग्रेस आणि लीग यांना जवळ आणणाऱ्या १९१६ सालच्या लखनौ करारावेळी टिळकांसोबतीनं त्यांनी काम केलेलं होतं. लीगची स्थापना १९०६ साली झाली, पण तेव्हापासून कितीतरी वर्षं जिनांनी लीगचं सदस्यत्व घेतलेलं नव्हतं, हेही ऐतिहासिक तथ्य आहे. १९१३ साली त्यांनी लीगचं सदस्यत्व घेतलं आणि तीन वर्षांनी ते लीगचे अध्यक्ष झाले.

हिंदू आणि मुस्लिमांमध्ये सत्तेचं विभाजन होईल अशा संयुक्त भारतासाठी जिना शेवटपर्यंत वाटाघाटी करत होते, हे सुचवणारा ठोस ऐतिहासिक पुरावा उपलब्ध आहे. पाकिस्तानची निर्मिती हे आपलं अंतिम ध्येय असल्याचं लीगनं जिनांच्या नेतृत्वाखाली १९४० साली ठरवलं. त्या वेळीसुद्धा ही मागणी सार्वभौम मुस्लीम राष्ट्रासाठी आहे की नाही याविषयी बरीच संदिग्धता कायम होती. हिंदू व मुस्लीम यांच्यात सत्तावाटपाची रचना असलेल्या संघराज्यीय भारताची मांडणी करणाऱ्या 'कॅबिनेट मिशन' योजना १९४६ साली जिनांनी स्वीकारली होती. काँग्रेसनं या संदर्भातील आपलं आश्वासन मागं घेतलं आणि संपूर्ण वाटाघाटींची प्रक्रिया कोलमडली. शेवटी ब्रिटिशशासित भारताची फाळणी अपरिहार्य ठरली, तेव्हा काँग्रेस आणि महासभा यांनी पंजाब व बंगाल यांची एकाच वेळी विभागणी व्हावी यासाठी हातात हात घालून काम केलं होतं. यात स्पष्टपणे द्विराष्ट्र सिद्धान्ताचं समर्थनच होतं. संयुक्त भारतामध्ये हिंदूंसोबत मुस्लीम राहू शकत नसतील, तर

त्याच न्यायानं पंजाब व बंगालमधील हिंदूंना (आणि शिखां) पाकिस्तानात मुस्लिमांसोबत राहाणं अशक्य आहे, असा युक्तिवाद काँग्रेस व महासभा यांच्याकडून केला जात होता. दीर्घ काळ या ऐतिहासिक तपशिलांना नाकारलं जात होतं आणि हा सगळा काँग्रेसविरोधी 'नवसाम्राज्यवादी' इतिहासलेखनाचा भाग असल्याचा दावा भारतीय राष्ट्रवादी इतिहासकार करत होते. या पार्श्वभूमीवर, हा सर्व तपशील सार्वजनिक संभाषितामध्ये समोर आणणं आवश्यक आहे.

त्याच वेळी आपण हेही लक्षात घ्यायला हवं की, गेल्या आठवड्यात अलीगढ मुस्लीम विद्यापीठात झालेला हिंसाचार हा काही ऐतिहासिक अर्थनिर्णयनांशी संबंधित वाद नव्हता. या सर्व हिंसक प्रक्रियाचा गाभा आपण स्पष्टपणे समजून घ्यायची गरज आहे. चिकित्सक विचाराच्या केंद्रांना विरळ करण्याच्या भाजपच्या प्रयत्नांचा हा भाग आहे. अलीगढ मुस्लीम विद्यापीठानं अजूनही 'मुस्लीम' हा शब्द आपल्या नावात कायम ठेवण्याचं धाडस केलं आहे, हे पाहता मोदींच्या भारतात आणि आदित्यनाथांच्या उत्तर प्रदेशात ही जागा लक्ष्यस्थानी पडणं साहजिकच आहे. या सरकारच्या कार्यकाळाच्या अखेरच्या टप्प्यात अलीगढ मुस्लीम विद्यापीठावर हल्ला झाला आहे, हेही सूचक आहे. या हल्ल्याचे पडसाद २०१९च्या निवडणुकांपर्यंत उमटत राहावेत, या दृष्टीनं ही तजवीज करण्यात आलेली दिसते.

●

---

## काश्मिरची समस्या सुधारण्यापलीकडं गेली आहे का?

*नवी दिल्लीच्या कठोर भूमिकेमुळं संवादाचे सर्व पर्याय बंद होत आहेत.*

रमझानच्या काळातील शस्त्रसंधी सुरू करावी, अशी विनंती केंद्र सरकारला करण्याचा निर्णय जम्मू-काश्मीरच्या मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती यांनी ९ मे रोजी बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीमध्ये घेण्यात आला. या निर्णयामध्ये आशेपेक्षा निराशाजनकताच जास्त आहे. अशी शस्त्रसंधी जाहीर होईल असं गृहीत धरलं, तरीही त्याला काश्मीरमध्ये कसा प्रतिसाद मिळेल याचा अंदाज बांधणं अवघड आहे. बंदुका आणि रस्त्यांवरील निदर्शनं यांच्याद्वारे काश्मीरमधील तरुणाईनं नव्या रूपातील विद्रोहाची सुरुवात केली आहे. आता केवळ 'तुटलेपण' आणि दडपशाहीविरोधातील 'रोष' एवढ्यापुरता हा प्रश्न मर्यादित राहिलेला नाही. रस्त्यांवरच्या विद्रोहाचा अदमास घेतला तर निदर्शकांना आता सुरक्षा दलांच्या बंदुकांमधून निघणाऱ्या गोळ्या व छऱ्याची अजिबातच भीती राहिलेली दिसत नाही. हा जीवन-मरणाचा लढा आहे, त्यामागं आंधळा निर्धार असेल किंवा सुरक्षा दलांना मारून अथवा थकवून भारताचा रक्तबंबाळ करण्याची व्यूहरचना असेल किंवा सातत्यानं अवमान सहन करण्याचं नाकारणारी बंडखोर वृत्ती असेल. काश्मीर आणि नवी दिल्ली यांच्यातील विश्वासात प्रचंड घट झाली आहे, त्यामुळं शांततापूर्ण प्रतिकारावरची श्रद्धाही रोडावते आहे. शांततापूर्ण प्रतिकार व उदारमतवादी विचारांविषयी विद्यार्थ्यांना शिकवण देणारे काश्मीर विद्यापीठातील एक शिक्षक सशस्त्र बंडखोरीमध्ये सामील झाले आणि त्यानंतर दोन दिवसांमध्ये सशस्त्र दलांसोबतच्या चकमकीत त्यांचा मृत्यू झाला, ही ताजी घटना याचा एक मोठा दाखला आहे. आता केवळ शांततापूर्ण अभिव्यक्तीच्या दबलेल्या अवकाशांची ही समस्या उरलेली नाही, तर शांततापूर्ण उपाय वा प्रतिकारावरचा विश्वास संपुष्टात आल्याची ही लक्षणं आहेत.

या पार्श्वभूमीवर, सर्व राजकीय पक्षांनी सामूहिक विनंती केल्यावर तरी केंद्र सरकार काश्मीरविषयी वेगळा विचार करेल का, हा अधिक मोठा प्रश्न आहे. हिंसाचार

थांबवण्यासाठी संवादाची सुरुवात करावी, अशी विनंती मुफ्ती यांनी वारंवार केली असूनही केंद्र सरकारनं त्याकडं दुर्लक्ष केलेलं आहे. आधीच्या सरकारांपेक्षा भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) सरकारचं धोरण अधिक कठोर आहे. क्रूर सत्ता राबवताना लोकशाही व्यवहाराचा बहाणाही करणं, अधूनमधून वरवरचे उपाय करणं आणि विश्वासवृद्धीसाठी तकलादू प्रयत्न करणं, असं आधीच्या सरकारांचं धोरण होतं; पण भाजप सरकारला एवढीही पर्वा उरलेली नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची प्रेरणा असलेला भाजप असले बहाणेही करत नाही. काश्मीरला क्रूररित्या दडपण्याची विचारसरणीच भाजपनं जोपासली आहे, पण त्याचसोबत भारताची मूळ संकल्पना बदलून लोकशाहीला हानी पोचवणं हाही या विचारसरणीचा भाग आहे. जम्मू-काश्मीरमधील लोकसांख्यिकी रचनेत बदल करण्याच्या भाजपच्या दीर्घकालीन योजनेच्या दृष्टीनं काश्मीरचं स्थान महत्त्वाचं आहे. तिथल्या मुस्लीम लोकसंख्येचं दमन करणं आणि पुढं जाऊन भारताला हिंदूराष्ट्र बनवण्याचं व्यापक ध्येय साध्य करणं, हे सर्व एकाच योजनेचा भाग आहे. अनागोंदी असलेलं, हिंसक आणि अतिरेकी वृत्तीचं काश्मीर या साध्याच्या दृष्टीनं सोयीचं आहे.

अशा वेळी काश्मिरींच्या प्राणांची पर्वा करायची नसेल, तरी सैनिकांच्या बाजूनं होणाऱ्या मोठ्या प्राणहानीची तरी काळजी केंद्र सरकारनं करायला हरकत नव्हती. पण सरकारला याचीही चिंता दिसत नाही. २०१८ या वर्षामध्ये ४० सशस्त्र बंडखोरांचा मृत्यू झाला आहे, तर २४ सैनिकांना प्राण गमवावे लागले आहेत. जीवितहानीचं गुणोत्तर २:१ असं राहिलं आहे, त्यामुळं केंद्र सरकारच्या काश्मीर धोरणामागील सैनिकी समज शंकास्पद ठरते आहे. शिवाय, या हिंसक संघर्षामध्ये (दगडफेकीत) एका पर्यटकासह ३७ नागरिकांचे प्राण गेले आहेत, शेकडो लोकांना बंदुकीच्या गोळ्या व छऱ्यांनी जखमी केलं आहे. या आनुषंगिक हानीमुळंही बंडखोरीची पातळी कमी झालेली नाही. काश्मीरमधील जखमी मनांसाठी बंडखोरांचं व नागरिकांचं रक्तही खतपाणी देणारं ठरतं आहे, त्यातून मोठ्या संख्येनं नवीन बंडखोर उदयाला येत आहेत.

त्यामुळं सर्व पक्षीय प्रतिनिधीमंडळाला नवी दिल्लीचं मन वळवण्यात यश येण्याची शक्यता कमीच आहे. अशा वेळी राज्यातील संघर्ष कमी करण्यासाठी मुफ्ती यांच्याकडं कृतीचे मर्यादित पर्याय उपलब्ध आहेत. दगडफेक करणाऱ्यांबाबतीत कठोर भूमिका न घेणं, एवढी एक कृती मात्र त्या स्वतःच्या अधिकारक्षेत्रामध्ये करू शकतात. अटकसत्र, प्राथमिक माहिती अहवाल आणि सातत्यानं होणारी छळवणूक यांच्या कात्रीत सापडलेल्या दगडफेक करणाऱ्यांना बंदुका हातात घेणं अपरिहार्य होऊन जातं. परंतु, मुफ्ती यांनी या धोरणात बदल केला तरीही त्याचा उपाय वरवरचाच होणार आहे. फुटीरतावादी मसरत आलमचा दाखला या संदर्भात लक्षात घेता येईल. पीपल्स डेमॉक्रटिक पार्टी (पीडीपी) आणि भाजप यांच्या सरकारनं सत्तेची सूत्रं हाती घेतल्यानंतर दिवंगत माजी मुख्यमंत्री मुफ्ती मोहम्मद सयीद यांनी आलमची सुटका केली होती, पण केंद्र सरकारकडून दबाव आल्यावर त्याला पुन्हा अटक करावी लागली.

पारंपरिक सत्तारचनेनुसार काश्मीरच्या बाबतीतील सर्वाधिकार दिल्लीकडं राहातात, त्यामुळं राज्य सरकारचे अधिकार व कार्यक्षमता यांना मर्यादा पडते. सध्या पीडीपीनं सामोपचारासाठी केलेले प्रयत्न व मांडलेले सर्व प्रस्ताव नवी दिल्लीकडून नाकारले जात आहेत. कथुआ बलात्कार व खून प्रकरणामध्ये भाजपनं तीव्र प्रतिकार केला असूनही मुफ्ती यांनी कठोर भूमिका घेतली, हा या संदर्भातील एकमेव अपवाद होता. कदाचित या प्रकरणातील न्यायप्रक्रियेमध्ये अडथळा आणण्यापेक्षा जम्मूमधील जमातवादी दुफळी वाढवण्याचं भाजपचं व्यापक उद्दिष्ट असल्यामुळं, हे घडलं असेल. तसंही जमातवादी भेद तीव्र करण्याच्या प्रयत्नात भाजपला यश आलंच आहे.

पीडीपीचा संवादासाठीचा प्रयत्न अपयशी ठरण्याची शक्यता आहे. पण तरीही तरुणाईची हानिकारक ऊर्जा सर्जनशील संवादाच्या दिशेनं वळवण्याची सकारात्मक भूमिका निभावणं राज्य सरकारला अजूनही शक्य आहे. काहीही झालं की प्रत्येक वेळी शाळा व महाविद्यालयं बंद करण्याऐवजी शैक्षणिक संस्थांना विचार व मतमांडणीचे मुक्त अवकाश बनण्याची मुभा राज्य सरकारनं द्यायला हवी. प्रतिकार थांबवण्याचा कोणताही मार्ग सरकारकडं नाही. नवीन पिढीच्या मनांमध्ये प्रतिकाराची वृत्ती खोलवर रुजलेली आहे. अशा वेळी शांततापूर्ण व अर्थपूर्ण प्रतिकारासाठी मुक्तावकाशाला मुभा देणं, एवढाच उपाय राज्य सरकार करू शकतं. त्यातूनच संवादाचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे.

●

---

## 'ऐतिहासिक चुकी'ची ७० वर्षं

*स्थापनेपासून आजतागायत इस्राएलनं पॅलेस्टिनी व इतर शेजाऱ्यांविरोधातील युद्ध सुरू ठेवलं आहे.*

इस्राएलचा सत्तरावा वर्धापनदिन होत असताना या देशाची युद्धखोर वृत्तीही स्थापनेपासून आजपर्यंत टिकून आहे. अरब जगतात सुरू असलेल्या लढायांमध्ये या वा त्या बाजूनं होणाऱ्या गुप्त कारवाया व छुप्या युत्या यांतून शेवटी इराणविरोधात जवळपास युद्धाची घोषणाच झालेली आहे. हे युद्ध सध्या सिरियाच्या प्रदेशात सुरू असलं, तरी मे महिन्याच्या सुरुवातीला यातील तीव्रतेत झालेली धोकादायक वाढ बघता नजीकच्या भविष्यात मोठा भडका उडण्याची शक्यता आहे.

या हिंसक परिस्थितीची तीव्रता वाढवण्यासाठीचा हिरवा कंदील ८ मे रोजी वॉशिंग्टन डीसीवरून दाखवण्यात आला. अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी विविध प्रकारच्या वंशवादी व ज्यूविरोधी मंडळींच्या एका सभेमध्ये या संदर्भातील संकेत दिले. इराणच्या आण्विक संशोधन कार्यक्रमांवरील काही मर्यादांची हमी मिळवणाऱ्या करारातून अमेरिका माघार घेईल, अशी घोषणा ट्रम्प यांनी केली. ही मागणी इस्राएल सातत्यानं करत होता.

इराण, अमेरिका आणि इतर पाच भागीदारांमध्ये दीर्घ काळ झालेल्या वाटाघाटींनंतर जुलै २०१५मध्ये या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या होत्या. अंमलबजावणीची विश्वसनीय यंत्रणा असलेला हा ठोस करार आहे, असं मत तज्ज्ञांनी व्यक्त केलं होतं. अशा वेळी, आण्विक प्रसारबंदी कराराखालील काही अटींचा स्वतःकडून अंधुक भंग झाला तर इराण तुटलेपणाचा तुरुंग तोडून बाहेर येईल आणि त्यातून आपल्या अस्तित्वालाच धोका निर्माण होईल, अशी अवाजवी भीती इस्राएलकडून वर्तवली जात होती.

स्वतःच्या शेजारामध्ये मात्र इस्राएलनं पॅलेस्टिनी लोकांचा इतिहास व अस्मिता यांच्या विरोधातील युद्धाची पुढची पातळी गाठली आहे. अमेरिका आपला इस्राएलमधला दूतावास जेरुसलेमला हलवणार असल्याचं ट्रम्प यांनी जाहीर केल्यानंतर सर्व मर्यादा सोडून इस्राएलनं आपली युद्धखोरी पुढं दामटली आहे. हा निर्णायक बदल इस्राएलच्या स्थापना दिवशी म्हणजे १४ मे रोजी होणार आहे. हाच दिवस पॅलेस्टिनी लोक नक्बा किंवा महासंकट म्हणून पाळतात. मार्च महिन्याच्या मध्यापासून पॅलेस्टिनी लोक या दिवसाची पूर्वतयारी करत आहेत. गाझा पट्टी आणि इस्राएलनं औपचारिक ताबा घेतलेली भूमी यांच्यामधील मोठ्या तटबंदीच्या दिशेनं मोर्चे काढले जात आहेत.

गाझामधील दोन-तृतीयांशाहून अधिक लोकसंख्या निर्वासितांची आहे. इस्राएलकडून वेळोवेळी झालेल्या आक्रमणांमुळं मृत्यू आणि विध्वंस यांच्या छायेत यातील

काहींना अनेक वेळा स्वतःचा निवारा गमवावा लागला आहे. आपली मातृभूमी परत मिळवण्याचा अधिकार उद्घोषित करण्याचा प्रयत्न म्हणून पॅलेस्टिनी लोक या सीमेवरील तटबंदीपर्यंत 'भूमी मोर्चे' काढत आहेत. शुक्रवारच्या प्रार्थनेनंतर काढण्यात येणाऱ्या या निषेध मोर्चांविरोधात इस्राएलनं केलेल्या कारवाईत आतापर्यंत ५१ गाझावासीयांना प्राण गमवावे लागले आहेत. या कारवाईला 'ह्यूमन राइट्स वॉच' या संस्थेनं 'बेकायदेशीर' संबोधलं आहे आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयानं या प्रकरणात तपास करावा असंही म्हटलं आहे.

तज्ज्ञांनी या संदर्भात व्यक्त केलेली मतं अमेरिकेच्या उन्मादी उत्साहाला छेद देणारी आहेत. गाझामधील हत्याकांड आणि सिरियातील युद्धपरिस्थितीमध्ये झालेली वाढ, यांवर प्रतिक्रिया देताना अमेरिकेनं म्हटलं आहे की, इस्राएलला स्वतःचा बचाव करण्याचा पूर्ण अधिकार आहे. इस्राएलला सत्तर वर्षं पूर्ण होत आली असताना या देशाच्या अस्तित्वामागील जागतिक वैधतेच्या व्यवस्थेचं अचूक वाचन करणं महत्त्वाचं ठरतं. आपल्या भूमीच्या पुनर्स्थापनेचा जागतिक मान्यता असलेला अधिकार वापरणाऱ्या निःशस्त्र आंदोलनकर्त्यांचे जीव घेणं आणि शेजारी देशांवर आक्रमणं करणं, असा कृत्यांना स्वसंरक्षणाचं समर्थन इस्राएल देतो. पण स्वसंरक्षणाच्या अधिकाराची व्याप्ती इतक्या हिंसक पातळीपर्यंत विस्तारणाऱ्या राज्यसंस्थेचं स्वरूप नक्की कसं आहे?

या प्रश्नाचं उत्तर इस्राएली राजकीय अवकाशामध्ये गेला काही काळ निनादतं आहे. गेल्या वर्षी इस्राएलचे माजी पंतप्रधान एहुद बरॅक विस्मृतीच्या गर्तेतून परत आले आणि इस्राएल वर्णद्वेषी राज्यसंस्था बनण्याच्या धोकादायक मार्गावर निघालेला आहे असं विधान त्यांनी केलं (खरं तर इस्राएल तिथं पोचलेला आहे, असंही म्हणता येईल). वर्णद्वेष ही भविष्यातील शक्यता उरलेली नसून अस्तित्वात आलेली वस्तुस्थिती बनली आहे, अशी धोक्याची सूचना इस्राएलमधील राजकीय अभिजनवर्ग असलेल्या अश्केनाझिमचे वंशज व क्नेसेटचे माजी सभागृहाध्यक्ष अवराहम बर्ग यांनी २००३ सालीच दिली होती.

इस्राएलच्या राजकीय संभाषितामध्ये याला लोकसांख्यिकीची समस्या असं संबोधलं जातं. वास्तविक ज्यूवादी देश म्हणून इस्राएलची स्थापना झाल्यापासून पछाडल्याप्रमाणे हा प्रश्न मांडला जातो आहे. ज्यूंच्या ताब्यातील भूमीवर पूर्ण वेढा बसवण्यासाठी इस्राएलनं मोठ्या प्रमाणात लोकसंख्येला त्या भागांमध्ये वसवायला सुरुवात केली. विशिष्ट मर्यादेनंतर हे धोरण अव्यवहार्य ठरल्यावर एकतर्फी फाळणीचा प्रस्ताव कल्पिण्यात आला. 'दोन देश ठेवण्याचा उपाय' सर्व व्यावहारिक कारणांमुळं शेवटी २००० साली बरॅक यांच्या ढोंगी शांतेच्या प्रस्तावावर येऊन थांबला, पण अधूनमधून लोकसांख्यिकीसंदर्भातील लाजीरवाणी परिस्थिती निवळवण्यासाठी याचा उपयोग केला जातो.

या भागातील शांतता प्रक्रियेला सुरुवात करण्याचा शेवटचा प्रयत्न म्हणून २००८ साली अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांनी अमेरिकेतील ॲनापोलीस इथं इस्राएल व पॅलेस्टाईन या दोन्हींच्या प्रतिनिधींची बैठक घडवली. दीर्घ काळ टोकाच्या उजव्या विचारसरणीचं वर्चस्व सहन करावा लागलेला इस्राएल त्या वेळी स्वतःला कथितरित्या सावरत होता. परंतु, ॲनापोलीसच्या गोपनीय अवकाशातही इस्राएलच्या तत्कालीन परराष्ट्र मंत्र्यांनी (जे स्वतः शांततेच्या बाजूनं असणारे व्यवहारवादी म्हणून परिचित होते) अशी मागणी ठेवली की, एक ज्यू देश म्हणून इस्राएलचं कायमस्वरूपी अस्तित्व पॅलेस्टिनींना मान्य असेल तरच इथून पुढं चर्चा होईल. याचा अर्थ, निर्वासितांना त्यांच्या मूळ भूमीवर परतण्याचा अधिकार मिळणार नाही आणि इस्राएलमधील पॅलेस्टिनी अल्पसंख्याकांचा नागरिकत्वाचा दर्जाही कायम संदिग्धतेच्या गर्तेत राहील. पॅलेस्टिनींच्या दृष्टीनं ही मागणी स्वीकारणं म्हणजे सामूहिक आत्महत्याच ठरली

असती. इस्राएली राज्याच्या वांशिक शुद्धतेच्या प्रतिपादनामुळं अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्री कॉन्डोलिझा राइस सर्द झाल्या. पण हा केवळ क्षणिक हळवेपणाचा भाग होता. लगेचच राईस यांनी अमेरिकेच्या 'इस्राएलला प्राधान्य' देण्याच्या सामरिक धोरणानुसार कार्यवाही केली आणि आपली निष्ठा अढळ ठेवली.

ओबामा प्रशासनाच्या कार्यकाळात व्यवहारवादानं काही वेळा एककल्ली विचारांवर किंचित मात केली असेलही. पण इस्राएलच्या रूपातील खोटारड्या वंशद्वेष्ट्या राज्यसंस्थेला समर्थन देण्याचं पूर्वीचं निःसंदिग्ध धोरण अमेरिका पुन्हा अंगिकारणार असल्याचे संकेत ट्रम्प यांनी दिले आहेत. आता पुन्हा एकदा ज्वलनशील शेजारामध्ये ठिणगी पाडण्याची तयारी इस्राएल करतो आहे, अशा वेळी उर्वरित जगानं या सर्व समस्येच्या भयानक पडसादांची दखल घ्यायला हवी. पुरस्कारप्राप्त नाटककार आणि पटकथालेखक टोनी कुशनर यांचं या प्रश्नावरचं भाष्य या प्रसंगी अचूक ठरतं : इस्राएल ही 'ऐतिहासिक चूक' आहे, असं ते म्हणाले होते.

●

**अनु. : प्रतिनिधी**

काश्मीरवरील टिपण काश्मीर टाईम्सच्या कार्यकारी संपादक अनुराधा भसीन (anusaba@gmail.com) यांनी लिहिलेलं आहे. इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे (१२ मे व १९ मे २०१८ या अंकांतून).


**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक परभणीमध्ये मिळण्याचे ठिकाण**

पूजा ग्रंथ वितरण

द्वारा संभाजी वाघमारे, बी. रघुनाथ हॉल, वसमत रोड, परभणी

भ्र. ९८६०९८५६५२

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक अकोल्यामध्ये मिळण्याचे ठिकाण**

हरिष बुक स्टॉल

न्यू बस स्टँड, अकोला

भ्र. ९८२२२३३२६४

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक लातूरमध्ये मिळण्याचे ठिकाण**

अर्हन्त बुक डिस्ट्रिब्युशन

द्वारा विश्वदिप मेडिकल स्टोअर्स, एच. बी. टेकाळे, तुळजाई हॉस्पिटलसमोर, प्रकाशनगर, लातूर

भ्र. ९७६७८०११४०

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक नांदेडमध्ये मिळण्याचे ठिकाण**

मीडिया ॲडस्

द्वारा राहूल वाघमारे, विष्णू कॉप्लेक्स, हॉटेल ताज पाटील समोर, नांदेड

भ्र. ९८६००८३१३४

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक अमरावतीमध्ये मिळण्याचे ठिकाण**

युनिक बुक्स

देविदास आर्केड, पंचवटी स्क्वेअर, मोर्शी रोड, अमरावती ४४४६०४

भ्र. ०७२१-६५२१२४३

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक जळगावमध्ये मिळण्याचे ठिकाण**

अथर्व पब्लिकेशन्स

तळमजला, ओम हॉस्पिटल, अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, दत्त कॉलनी, जळगाव-४२५००१

दू. ०२५७-२२३९६६६